# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 11/07/2019**

**सभा सुचना क्रं. 05**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. स्थायी समिती दि. 01/07/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा सुचना क्र.5 दि. 01/07/2019_ रोजीचे इतिवृत्त माहितीस्तव असून ते सभेने अवलोकन करून त्यास सभेने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. अतुल सांळुखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | मा.स्थायी समिती सदस्यपदी असलेले 1) श्रीम.सुषमा लोपीस 2) श्री.किशोर नाना पाटील 3) श्रीम. दिक्षा घरत 4) श्री. अतुल साळुंखे 5) श्रीम. विद्या पाटील 6) श्री. वैभव पाटील 7) श्री. दिलीप गोवारी 8) श्री. महेश पाटील हे आठ सदस्य निवृत्त होत असलेबाबत. | ठराव :- निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या रिक्त जागी नव्याने सदस्य नियुक्ती करण्यासाठी सदरचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग समिती, इतर कार्यालय यांना संगणक संच, लॅपटॉप, यु.पी.एस व पोर्टेबल हार्ड डिस्क GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून खरेदी करणेकामी दर मंजूर करुन खरेदी करणेस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चचा करणेंत आली. याकामी 38 संगणक खरेदी करणेकामीच्या निविदेतील लघुत्तम निविदाकार मे.के.जे.एम. ग्रुप सिस्टम सोल्युशन व 4 लॅपटॉप, 45 यु.पी.एस व 2 पोर्टेबल, हार्ड डिस्क खरेदी करणेकामी GEM पोर्टलवरील लघुत्तम पुरवठादार यांचे दर मंजूर करून सदर साहित्य खरेदी करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 4. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती -जी वालिव कार्यक्षेत्रातील कामण विभागात भरणारा दैनंदिन व आठवडा बाजार | ठराव :-_वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - जी कामण विभागात दैनंदिन शुल्क वसुलीसाठी वार्षिक ठेका देण्यांत येतो. सन 2018/2011 विक्री बाजार शुल्क ठेका रू. 4,88,400/- (अक्षरी रूपये चार लाख अठ्याऐंशी हजार चारशे मात्र) तसेच सदर रक्कमेवर 10% वाढ करून रू. 48,840/- अपेक्षित असून |

| | | |
|---|---|---|
| | शुल्क वसुलीचा ठेका सन 2019/20 या वर्षाकरीता ठेका (ई-निविदा) प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | 2019/2020 साठी एकूण रक्कम रू. 5,37,240/- (अक्षरी रू. पास लाख सदोतीस हजार दोनशे चाळीस रू.मात्र) अपेक्षित रक्कम तसेच होणाऱ्या ई-निविदा रक्कमेवर उच्चत्तम रक्कमेवर 18% जीएसटी (GST) आवश्यक आहे. तरी वृत्तपत्रात जाहीर ई-निविदा मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करून ठेका देणेस तसेच सदर ई-निविदा प्रक्रिया 2019/20 या कालावधीकरीता सदर ठेका देणेस व ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील ठेकेदारास पुर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देण्याकरीता ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय खर्चास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या सातिवली विभागात भरणारा दैनंदिन व आठवडा बाजार शुल्क ठेका वसुलीचा सन 2019-20 या वर्षाच्या वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती "जी" सातीवली विभागात भरणारा दैनंदिन व आठवडा बाजार मंजूर ठेक्याच्या वाढीव दर व वाढते साहित्य दर लक्षात घेता सन 2018/19 या वर्षाचा आर्थिक ठेका रक्कम रू. 45,45,000/- या रक्कमेवर 10% वाढ करून सन 2019/20 या वर्षाकरीता रक्कम रू. 49,99,500/- (अक्षरी रक्कम रू. एकोणपन्नास लाख नव्याण्णव हजार पाचशे मात्र) सदर रक्कमेवर जी.एस.टी अपेक्षित रक्कम गृहीत धरून ई-निविदा पध्दतीने निविदा मागविणेबाबत वृत्तपत्रात जाहीर ई-निविदा सूचना प्रसिध्दी करण्यास ही सभा प्रशासकीय व त्या अनुषंगिक खर्चास वित्तीय मान्यता देत आहे. अटी शर्तीमध्ये मंजूर निविदा धारकाचे ई-निविदा धारकाचे ई-निविदा रक्कमेवर शासकीय दराने नियमानुसार 18% जी.एस.टी.कर घेणे आवश्यक आहे. तसेच निविदा प्रक्रियेस विलंब झाल्यास मनपाचे आर्थिक नुकसान टाळणेकरीता नविन ठेका अस्तित्वात येईपर्यंत मागील ठेकेदारास मागील मंजूर ठेक्याच्या रक्कमेत 10% वाढ करून जी.एस.टी. करासहीत बाजार वसुली पूर्वलक्षी प्रभावाने करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | व्यवसायाकरीता ना हरकत दाखला व साठा परवाना देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. महानगरपालिकेकडे उत्पन्नाचे मर्यादीत स्त्रोत आहेत व महापालिका क्षेत्रात नाहरकत दाखले /परवाने न घेता पुर्वापार मोठ्या प्रमाणात छोटे मोठे व्यवसाय सुरु आहेत व प्रस्तावनेत प्रस्तावित केलेली कोणतीही कागदपत्रे त्यांचेकडे उपलब्ध असणार नाहीत. त्यामुळे असे व्यवसायिक महानगरपालिकेकडे नाहरकत दाखला/ परवाने घेण्यासाठी येणार नाहीत. सबब, महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. करीता ही स्थायी समिती खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे. महापालिका क्षेत्रात अनेक वर्षापासूनच्या पुर्वापार बाजारपेठा उपलब्ध आहेत व त्यात अनेक व्यवसायिक, व्यवसाय करत आहेत. त्यामूळे त्यांना नाहरकत दाखले /परवाने देताना लवचिकता असणे आवश्यक आहे. पारदर्शकतेने संबंधिताना परवाने/नाहरकत दाखले देताना/ नुतनीकरण करताना मालमत्ता धारकाकडील कर भरणा केल्याची पावती हा पुरावा आवश्यक आहे. कारण महानगपालिकेच्या |

दृष्टीने आर्थिक स्त्रोत वाढविणे ही महत्वाची बाब आहे. भाड्याच्या जागेत व्यवसाय करीत असल्यास जागा मालक व भाडेकरु यांच्या दरम्यान झालेला भाडेकरार व कर भरणा पावती नाहरकत दाखला / परवाने देताना आवश्यक आहे. महानगरपालिका क्षेत्रात यापुढे नव्याने विकसीत होणाऱ्या संकुलातील व्यवसायिक/ उद्योजकांना नाहरकत / परवाने देताना प्रस्तावात नमुद कागदपत्राऐवजी मालमत्ता कर पावतीच्या आधारे नाहरकत दाखले /परवाने देण्यांत यावेत. तसेच महानगरपालिका पुरस्कृत बचत गटांना बाजारपेठा उपलब्ध करुन दिल्यास निशुल्क नाहरकत दाखले देण्यात यावेत व सर्व नाहरकत दाखले व परवाने हे सर्व संबंधित प्रभाग समिती स्तरावर देण्यात यावेत अशी आजची सभा ठरवित आहे व खालील प्रस्तावित दरांना ही सभा मान्यता देत आहे.

**परवाना फी प्रस्तावित दर**

| अ.क्र. | क्षेत्रफळ | दर (रू. मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 1 ते 100 चौ. फुटापर्यंत | 1500 |
| 2 | 101 ते 250 चौ. फुटापर्यंत | 3000 |
| 3 | 251 ते 500 चौ. फुटापर्यंत | 5000 |
| 4 | 501 ते 1000 चौ. फुटापर्यंत | 7000 |
| 5 | 1001 ते 2500 चौ. फुटापर्यंत | 10,000 |
| 6 | 2501 ते 3500 चौ. फुटापर्यंत | 12,000 |
| 7 | 3501 ते 5000 चौ. फुटापर्यंत | 14,000 |
| 8 | 5001 ते 6500 चौ. फुटापर्यंत | 18,000 |
| 9 | 6501 ते 8000चौ. फुटापर्यंत | 25,000 |
| 10 | 8001 ते 10,000 चौ. फुटापर्यंत | 30,000 |
| 11 | 10,000 चौ. फुटाच्या पुढे | 50,000 |

**तात्पुरत्या स्वरूपाच्या कालावधीकरिता परवाना प्रस्तावित फी दर**

| अ.क्र. | कालावधी | दर (रू. मध्ये) |
|---|---|---|
| 1 | 1 ते 10 दिवस | 2500 |
| 2 | 11 ते 15 दिवस | 5000 |
| 3 | 16 ते 30 दिवस | 10,000 |
| 4 | 31 ते 60 दिवस | 20,000 |
| 5 | 60 ते 90 दिवस | 30,000 |

**विलंब आकार**

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>कालावधी</th><th>दर (रू. मध्ये)</th></tr>
<tr><td>1</td><td>1 ते 3 महिने</td><td>25 %</td></tr>
<tr><td>2</td><td>4 ते 6 महिने</td><td>50 %</td></tr>
<tr><td>3</td><td>7 ते 9 महिने</td><td>75 %</td></tr>
<tr><td>4</td><td>9 ते 12 महिने</td><td>100 %</td></tr>
<tr><td>5</td><td>पुढील प्रत्येक 3 महिन्यानंतर</td><td>मुळ रक्कम + विलंब आकार 100% अश्या येणाऱ्या एकूण रक्कमेवर 25% विलंब दंड</td></tr>
</table>
अनुमोदक :- मा. श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. उमेश नाईक<br>
ठराव सर्वानुमते मंजूर
</td>
</tr>
<tr>
<td>7.</td>
<td><u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती जी कार्यालयाच्या आस्थापनेवरील एल.एस.जी.डी. पदविका परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना अतिरीक्त दोन वेतनवाढ देणेबाबत.</u></td>
<td>ठराव :- सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून श्री. सुरेश हरेश्वर पाटील, वरिष्ठ लिपीक हे एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचे प्रशिक्षणाचा फायदा प्रशासनास काय झाला व त्यांचे कामकाजात काय सुधारणा झाली या विषयीचा सविस्तर प्रस्ताव तयार करून प्रशासनाने पुढील सभेत सादर करावा. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यंात येईल. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवण्यांत यावा.<br>
अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा. श्री. दिलीप गोवरी<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>8.</td>
<td><u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती जी कार्यालयाच्या आस्थापनेवरील एल.जी. एस पदविका परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना अतिरीक्त एक वेतनवाढ देणेबाबत.</u></td>
<td>ठराव :- सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून श्री. जिवन वायवळ, लिपीक-टंकलेखक हे एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचे प्रशिक्षणाचा फायदा प्रशासनास काय झाला व त्यांचे कामकाजात काय सुधारणा झाली या विषयीचा सविस्तर प्रस्ताव तयार करून प्रशासनाने पुढील सभेत सादर करावा. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यंात येईल. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवण्यांत यावा.<br>
अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा. श्री. दिलीप गोवरी<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>9.</td>
<td><u>कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर ) या पदावर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ठोक वेतनावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास पुन:श्च मुदतवाढ देणेबाबत.</u></td>
<td>ठराव :- संगणक विभागातील ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघुनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदत दि.22/04/2019 रोजी संपली आहे. संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांना दि. 24/04/2019 पासून पुढील सहा महिन्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका,अधिनियम कलम 53 (क) अन्वये नेमणूक करण्यास तसेच ठोक वेतनावरील खर्चास आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर खर्च महानगरपालिकेच्या</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स) या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.<br>**अनुमोदक :- मा. श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **वसई विरार शहर महानगरपालिका उसगाव/शिरवली 20 द.ल.ली क्षमता योजनेच्या पारोळ जलशुध्दीकरण केंद्रामधील फिल्टर बेडची वाळू, Valve,Sluice gate बदलणे तसेच Wash Water Pump, Air Blower बदलणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. मे. संताजी आर.कदम यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.60% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949% चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी मनपा तर्फे कायदेशीर बाबींची बाबींची पुर्तता करून करून संविदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे व त्याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.108 मधील संदेश जनरल स्टोअर्स ते माकोडीवाडी पर्यंत पाईप गटार करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूर मिळणे.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रू.48,85,939/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.113 मधील कोळीवाडा येथील जामा मस्जिद ट्रस्ट कब्रस्थान मध्ये विविध कामे करणेकामी आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रू. 15,55,749/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, मा. आयुक्त ह्यांनी मा. स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा. श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. अफीफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 13. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. 113 मधील वाल्मीकेश्वर येथे समाजमंदीर बांधणे कामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. वरील कामी तयार करणेंत आलेल्या रू. 17,47,621/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, मा. आयुक्त ह्यांनी मा. स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा. श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. अफीफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | **Diploma in Disaster Fire and Industrial Safety Management प्रशिक्षणाकरीता पुरस्कृत करणेबाबत.** | **ठराव :-** शहर आपत्ती व्यवस्थापन संस्था बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने **Post Graduation Diploma in Disaster Fire and Industrial Safety Management"** ह्या दोन सेमेस्टरच्या पार्ट टाईम कोर्स सुरू केलेला आहे. सन 2019-20 या शैक्षणिक वर्षासाठी महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी 1) श्री. संजय हेरवाड, अतिरीक्त आयुक्त 2) श्री. रमेश मनाळे अतिरीक्त आयुक्त 3) डॉ. किशोर गवस, उपआयुक्त 4) श्री.प्रकाश साटम, उपअभियंता 5) श्री. निलेश जाधव, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक यांना पाठविणेस तसेच यासाठी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा. श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**